मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ,ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर603 400 (पूर्व) ठाणे ,कोपरी ,बारा बंगला एरिया ,.
फोन 022 :- ,25329642 /25329865फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in/ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in


विषय एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत झाडे तोडण्यास व काामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याबाबत.
राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ चे सहा पदरीकरण कि.मी. ०.०० ते ८४.०० (पनवेल ते इंदापुर) संरेखेमध्ये बदल करणेसाठी १.०३७३ हेक्टर वनक्षेत्र मागणी प्रस्ताव.

जा.क्र. कक्ष-१०/वसं/प्र.क्र.६६(१)/१५-१६/जा.७०५ / १६-१७.

ठाणे - ४००६०३ दिनांक - २४ / १० / २०१६

वाचा :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/२/१२१५७(Align)/१००६/१४-१५ दि. १०/९/२०१४..

२) केंद्र शासन पत्र क्र. एफसी-१/एमएच-११/२०१५-नागपूर/२७१ दि. १६/३/२०१६.

३) उप वनसंरक्षक, रोहा यांचेकडील पत्र क्र. अ/२०/जमिन/१०६८ दि. २४/१०/२०१६.

४) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-११-३०६/२०१४/एफसी, दि. ८/८/२०१४.

५) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-१-३०६/२०१४/एफसी, दि. १५/१/२०१५.

६) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं.११/३०६/२०१४, दि. ७/५/२०१५.

७) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-२०१५/प्र.क्र.७७/फ-१०, दि.१/७/२०१५.

८) जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांचेकडील पत्र क्र. NHAI/PIU/PNVL/Forest/2016/२०४५ दि. ७/१०/२०१६

आदेश -

ज्याअर्थी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांचेकडून प्राप्त झालेला राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ चे सहा पदरीकरण कि.मी. ०.०० ते ८४.०० (पनवेल ते इंदापुर) संरेखेमध्ये बदल करणेसाठी १.०३७३ हेक्टर वनजमिनीचे वळतेकरण प्रस्ताव केंद्र शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांच्याकडून प्राप्त झालेला वळतेकरण प्रस्ताव, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, उप वनसंरक्षक अलिबाग व रोहा, मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे, मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर आणि महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची छाननी केल्यानंतर वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या तरतुदीनुसार १.०३७३ हेक्टर वनजमिन वळते करण्याची केंद्र शासनास शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर विचार करुन, राज्य शासनाने सादर केलेल्या प्रस्तावास अ. क्र. २ अन्वये काही अटीं शर्थीच्या अधिन राहून तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या तत्वतः मान्यता प्रत्रातील अटी/शर्तीची पूर्तता प्रकल्प यंत्रणेकडून करुन दिल्यानंतर पूर्तता अहवाल उप वनसंरक्षक रोहा यांनी उपरोक्त अ. क्र. ३ अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ. क्र. ४ व ५ अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेले आहेत. तसेच केंद्र शासनाने वरील अ. क्र. ६ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील झाडे तोडण्यास व कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाचे वरील अ. क्र. ७ चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

आणि ज्याअर्थी, प्रकल्प यंत्रणा, जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांनी उपरोक्त संदर्भिय पत्र अ. क्र. ८ अन्वये प्रकल्पांतर्गत कामे सुरु करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांना रस्त्यांतर्गत अंतभूत होणारे राष्ट्रीय महामार्ग क्र. १७ चे सहा पदरीकरण कि.मी. ०.०० ते ८४.०० (पनवेल ते इंदापुर) संरेखेमध्ये बदल करणेसाठी १.०३७३ हेक्टर वनजमिनीचे वळतेकरण प्रस्तावांतर्गत खाली दिलेल्या अनुसूचीतील रकाना ७ चे ३.७४९३ हेक्टर प्रस्तावित वन क्षेत्रापैकी यापूर्वीच मंजुरी प्राप्त झालेले रकाना क्र. ३ चे २.७१२ हेक्टर क्षेत्र वगळता उर्वरित १.०३७३ हेक्टर क्षेत्र म्हणजे उप वनसंरक्षक, अलिबाग व रोहा यांनी सादर केलेले प्रकल्प प्रस्ताव तपशिलात नमूद केलेली १.०३७३ हेक्टर वळतेकरण क्षेत्रात झाडे तोडण्यास व काम सुरु करण्यास परवानगी देत आहे. ही परवानगी केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या उपरोक्त संदर्भित पत्रातील अटी/शर्तीच्या पूर्ततेच्या अधिन राहून तसेच खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहेः-

१) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात कामे करण्यापुरती मर्यादित आहे.

२) प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत तत्वतः मान्यता मिळालेल्या पत्रातील अटींची पुर्तता तात्काळ करुन अंतिम मान्यता प्राप्त होईल याबाबत दक्षता घ्यावी. तत्वतः मान्यता मिळालेल्या दिनांका पासून ६ महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालनं करेल याची उप वनसंरक्षक अलिबाग व रोहा हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांना सादर करतील.

३) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत वनजमिनीवर काम सुरु करण्यापूर्वी, सबंधित उप वनसंरक्षक यांना कळविणे आवश्यक आहे. सबंधित उप वनसंरक्षक यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित वन जमीनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

४) सदर प्रकल्पास केंद्र शासनाकडून अंतिम मान्यता आणि तद्नंतर राज्य शासनाकडून औपचारिक वनक्षेत्र वळते करण्याचे आदेश अप्राप्त आहेत. सदर आदेश / मान्यता देताना घालून दिलेल्या अटीं / शर्ती प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

५) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) संबंधित उप वनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गत दिनांक २५.१०.१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचना मधील कलम १.९ नुसार अहवाल सादर करतील.

अनुसुची

| Approved Forest area | | | | Proposed forest area as per Realignment | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Village | Comptt. No. | Area in Ha. | Legal status | Village | Comptt. No. | Area in Ha. | Legal status |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| Nadvali | 243 | 1.75 | Reserved forest | Nadvali | 243 | 2.0423 | Reserved forest |
| Nadvali | 245 | 0.962 | | Nadvali | 243 | 0.8213 | |
| | | | | Nadvali | 245 | 0.8857 | |
| Total | | 2.712 | | Total | | 3.7493 | |

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.

प्रती,

उप वनसंरक्षक, रोहा.

निर्देश करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

प्रतिलिपी :- मा. सचिव (वने) मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रतिलिपी - उप वनसंरक्षक, अलिबाग यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाही सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- जनरल मॅनेजर (टेक्नीकल) व प्रोजेक्ट डायरेक्टर, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पीआययु, पनवेल यांजकडे माहिती तथा तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२.०० निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश सर्व्हे क्र., क्षेत्र आणि वैधानिक दर्जा आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे आणि संबंधित उपवनसंरक्षक यांना देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-११ (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे संदर्भिय पत्र क्र २ व वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे.